
M16/MPS941/EE/20160525

वेळ : 3 तास **गुण : 80**

विद्यार्थ्यांसाठी सूचना :

1. विभाग A वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्नांचा आहे. त्याची उत्तरे उत्तरपत्रिका / OMR Sheet वर नोंदवायची आहेत.

2. OMR Sheet वरील चार पर्यायांपैकी अचूक पर्यायाखालील वर्तुळ काळ्या पेनाने पूर्ण भरावे. वर्तुळ अर्धवट भरल्यास अथवा एका प्रश्नास जास्त वर्तुळ भरल्यास ते उत्तर चुकीचे समजले जाईल.



A B C D

उत्तराची अयोग्य नोंद



A B C D

उत्तराची योग्य नोंद

3. बहुपर्यायी प्रश्नांमध्ये सर्वात अचूक उत्तरे नोंदविणे अपेक्षित आहे.

4. विभाग B वस्तुनिष्ठ विनापर्यायी स्वरूपाचा आहे. त्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिली आहे.

5. विभाग C हा दीर्घोत्तरी स्वरूपाचा असून आवश्यक तेथे नकाशा व आकृत्या काढणे अपेक्षित आहे.

6. विभाग A साठी प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी 1/3 उणे गुणपद्धत लागू आहे.

7. विभाग B आणि विभाग C साठी उणे गुणपद्धत लागू नाही.

SECTION - A (गुण : 26)

या विभागात एकूण 52 प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला अर्धा गुण याप्रमाणे हा विभाग 26 गुणांचा आहे. या विभागाला 1/3 उणे गुणपद्धत लागू आहे.

1. चिनूक हे स्थानिक वारे _____ पर्वतातुन वाहतात.
   a) आल्पप्स b) ॲपेलेशियन
   c) ॲंडीज d) रॉकी

2. डॉगर बॅक हे मासेमारी क्षेत्र कोठे आहे?
   a) हिंदी महासागर
   b) अरबी समुद्र
   c) भूमध्य समुद्र
   d) वरीलपैकी नाही

3. खडकांच्या रासायिक विदारण क्रियेत समाविष्ट प्रकार सांगा?
   a) भस्मीकरण b) हायड्रेशन
   c) कार्बोनेशन d) वरील सर्व

4. अक्षवृत्तावर एखाद्या ठिकाणी पोहचवणारी सौरशक्ती वर्षात निरनिराळी असते का?
   a) ऋतुपरत्वे सुर्य किरणांनी पृथ्वीच्या पृष्ठभागाशी केलेला कोण बदलतो
   b) विवलाची लांबी बदलते
   c) सुर्यापासुन अंतर बदलते
   d) वरील सर्व

5. समान क्षारता मूल्यांच्या स्थळांना जोडणाऱ्या रेषांना _____ म्हणतात.
   a) समांतर रेषा
   b) समक्षार रेषा
   c) मध्य रेषा
   d) समभार रेषा

6. मानवकल्याण भूगोलाचा उदय होण्यामागे कोणती कारणे आहेत?
   a) वांशिक द्वेश
   b) दारीद्रय
   c) भुकबळी
   d) वरील सर्व

7. खालीलपैकी कोणत्या खडकाचा उपयोग रस्ते करण्यासाठी होतो.
   a) रूपांतरीत खडक
   b) अग्निजन्य खडक
   c) स्तरीय खडक
   d) वरील सर्व

8. ऑक्टोबर हीटचे अचूक वर्णन करणारी स्थिती कोणती?
   a) स्वच्छ आकाश, जास्त तापमाण
   b) जास्त तापमान, जास्त आर्दता
   c) कोरडी जमीन
   d) थंडी जास्त

9. गोंडवाना लॅंड या पॅंजियाच्या भागात खालीलपैकी कोणाचा सामावेश होतो.
   i) दक्षिण अमेरिका ii) भारत
   iii) ऑस्ट्रेलिया
   a) i व iii b) फक्त ii
   c) सर्व d) iii व ii

10. व्यापारी वारे दक्षिण गोलार्धातुन उत्तर गोलार्धात प्रवेश करताना _____.
   a) त्याच्या उजवीकडे वळतात
   b) त्याच्या डावीकडे वळतात
   c) काहीही बदल करत नाही
   d) होणारा बदल तेथील तापमाणाच्या परिस्थितीवर अवलंबुन असतो

11. मध्यपूर्वतील देशांमध्ये राहणाऱ्या लोंकाचा _____ गटात सामावेश होते.
   a) प्रोटो-ऑस्टेलॉईड b) मंगोलियन
   c) द्रविडीयन d) मेडियनेनियन

12. पॅसिफिक महासागरात खालीलपैकी कोणती बेटे आढळतात.
   a) दिएगो गार्सिया-क्युबा
   b) मलेशिया-इंडोनेशिया
   c) वेस्ट इंडिज-मादागास्कार
   d) फिलिपाईन्स-फिजी

13. समुद्राच्या भरती-ओहोटीचा खालीलपैकी कशाशी संबंधित आहे.
   a) चंद्र व पृथ्वी यांच्यातील अंतर
   b) पृथ्वी व सुर्य यांच्यातील अंतर
   c) जमिनीवरील उच्चदाबाचा पट्टा
   d) समुद्रावरील उच्च दाबाचा पट्टा

14. आंतर उष्णकटीबंधीय केंद्राभिमुखतेचा पट्टा (ITCZ) हे या पट्टयात आढळते.
   a) विषववृत्ताजवळ-हिंदी महासागर
   b) विषववृत्ताजवळ-अटलांटिक महासागर
   c) विषववृत्ताजवळ-पॅसिफिक महासागर
   d) ध्रुवीय प्रदेश

15. खालीलपैकी स्थानिक वारे कोणते आहेत.

i) मिस्ट्रल ii) चिनूक

iii) मौसमी

a) i व 2 b) ii व iii

c) सर्व d) फक्त iii

16. अमेरिकेतील रॉकी पर्वत हे कोणत्या दिशेत पसरलेले आहेत.

a) उत्तर-दक्षिण

b) पूर्व-पश्चिम

c) ईशान्य-नैऋत्य

d) वायव्य-आग्नेय

17. यु आकाराची दरी खालीलपैकी कशामुळे तयार होते?

a) नदीच्या खनन कार्यामुळे

b) नदीच्या संचयन कार्यामुळे

c) हिमनदीच्या खनन कार्यामुळे

d) हिमनदीच्या संचयन कार्यामुळे

18. वातावरणातील कोणत्या थरामधुन विधृत लहरी प्रवाहित होतात.

a) तपांबर b) आयनांबर

c) स्थितांबर d) दलांबर

19. ग्रानाईट हा पुढीलपैकी कोणत्या प्रकारचा खडक आहे.

a) रूपांतरीत खडक b) मुळखडक

c) स्तरीत खडक d) यापैकी नाही

20. पर्यावरण अपनतीचे मुख्य कारण _____ हे आहे.

a) मानवी हस्तक्षेप b) नदी प्रदुषण

c) कारखानदारी d) यापैकी नाही

21. सीमा थराच्या खाली शिलावरण व प्रावरण यांना विलग करणारा _____ संक्रमण थर आहे.

a) मोहो विलगता

b) कॉनरेड विलगता

c) गटेनबर्ग विलगता

d) यापैकी नाही

22. एखाद्या प्रदेशाचे संतुलन बिघडते आणि भु-पृष्ठाला हादरे बसुन भुकंप होतात. याला _____ म्हणतात.

a) समस्थायित्व भुकंप

b) अधोगामी स्थानांतरीय भुकंप

c) आंकुचन निर्मित भूकंप

d) पातालिय भुकंप

23. वाहणाऱ्या विविध वाऱ्यांच्या निर्मितीचे मुख्य कारण काय आहे?

a) वायूभारातील फरक

b) आद्रतेतील फरक

c) फेरेलचा नियम

d) पृथ्वीचे परिवलन

24. वाळवंटामध्ये वाऱ्याच्या घर्षणाने _____ खडक तयार होतात. हेच खडक खाली पडल्यानंतर त्याला _____ म्हणतात.

a) भूछत्र, चबुतरे

b) यारदंग, भूछत्र

c) गिरीश्रृंग मसा

d) पवनाकृती, मरूघळे

25. केशाकर्षण क्रियेमुळे मृदेत कोणता बदल होतो?

a) मृदेची सुपीकता वाढते

b) मृदेची सुपीकता कमी होते

c) मृदेतील ह्यूमलचे प्रणाण वाढते

d) मृदा कोरडी पडते

26. घळई v आकाराची दरी धबधबे, कुंभगर्ता यांची निर्मिती नदीच्या अपक्षरण चक्रातील (Erosion cycle) _____ अवस्थेत होते

a) अपक्षरणाची युवा अवस्था

b) अपक्षरणाची प्रौढ अवस्था

c) अपक्षरणाची वृद्ध अवस्था

d) वरील सर्व

27. EL-Nino हे _____ ?

a) पेरूच्या किणारपट्टीला असलेले व्यापारी वारे आहेत

b) प्रशांत महासागरातील शीत प्रवाह आहेत

c) ऑस्ट्रेलियाच्या पूर्व किणारपट्टीला असलेला उष्ण प्रवाह

d) पेरूच्या किणारपट्टीला निर्माण होणारा उष्ण सागरी प्रवाह

28. सागर जलाच्या बाबतीतील कोणती विधाने सत्य आहेत?

i) सागरी डोह आणि गर्तामध्ये सागरजलाचे तापमाण 2° से इतकेच असते.

ii) समुद्र सपाटीपासून 200 मी. खोलीवर सागरजलाचे तापमाण 15° से असते.

iii) सागरतळाकडे जास्त खोलीवर विषुवृत्तीय आणि ध्रुवीय अशा दोन्ही प्रेदशामध्ये तापमाण सारखे असते. आणि ते 2° से इतकेच असते.

a) फक्त i बरोबर b) फक्त i व ii बरोबर

c) सर्व बरोबर d) वरीलपैकी नाही

29. चुकीचा पर्याय निवडा

a) सहारा वाळवंट- बदाऊन लोक

b) टुड्रा प्रदेश (ग्रीनलँड)-एस्किमो

c) गवताळ प्रदेश (प्रेअरीज)-रेड इंडियन्स

d) विषुववृत्तीय हवामान (कांगो खोरे) सॅमॉइड

30. वाऱ्याच्या संचयन कार्यामुळे आढळणाऱ्या बारखाण या वाळुच्या टेकड्या कोणत्या हवामान विभागात आढळतात.

a) मौसमी

b) वाळवंटी

c) पश्चिम युरोपीय

d) टुंड्रा

31. सापेक्ष आर्द्रता _____ इतकी झाली. असता पाऊस पडण्यास सुरूवात होते.

a) 52% b) 65%

c) 82% d) 100%

32. ज्या मध्ये वनस्पतीजीवन समृद्ध होते अशा भुपृष्ठांच्या सर्वात वरच्या भुसभुशीत थरास _____ असे म्हणतात.

a) खादर b) मृदा

c) भाबर d) ह्यूमस

33. खालीलपैकी कोणता हिंदी महासागरातील सागरी प्रवाह नाही?

a) दक्षिण विषूववृत्तीय सागरी प्रवाह

b) मोंबाबिक सागरी प्रवाह

c) कुरोशिओ सागरी प्रवाह

d) अगुल्लाज सागरी प्रवाह

34. उन्हाळ्यात हिमालयीन व तिबेटचा प्रदेश तापल्याने कशाची निर्मिती होते?

a) पश्चिमी जेट स्ट्रीम

b) ईशान्य जेट स्ट्रीम

c) पुर्वीय जेट स्ट्रीम

d) उत्तरी जेट स्ट्रीम

35. खालीलपैकी कोणते विधान बरोबर आहे?

a) पेरु प्रवाह हा अटाकामा वाळवंटाच्या पश्चिमी किणाऱ्यावरून जातो.

b) कॅलिफोर्निया प्रवाह मेक्सिकोच्या वाळवंटातुन जातो.

c) पश्चिम ऑस्ट्रियन प्रवाह हा थंड प्रवाह आहे.

d) वरील सर्व

36. प्रेअरी प्रदेशातील चुकीचे विधान ओळखा

a) विषुववृत्ताच्या उत्तरेस व दक्षिणेस 30° व 55° अक्षवृत्ताच्या दरम्यान आहे.

b) प्रेअरी प्रदेशात सुमारे 40 ते 60 सेमी. पाऊस पडतो.

c) गवताची सर्वाधिक उंची या प्रदेशात आढळते.

d) ऑस्ट्रेलियातील मेरीनो मेंढीया प्रदेशातील प्रमुख प्राणी आहे.

37. सुर्यमालेतील सर्वात मोठा गृह कोणता?

a) सोम b) मंगल

c) बुध d) गुरू

38. कॅनडा व USA मध्ये किती टाईम झोन आहेत?

a) 3 b) 4

c) 5 d) 6

39. अरवली पर्वतातुन उगम पावणारी नदी कोणती?

a) अरवली

b) साबरमती

c) गोदावरी

d) प्रवरा

40. भारतीय पर्यटन विकास मंडळाची स्थापना केव्हा झाली?

a) 1966 b) 1967

c) 1968 d) 1999

41. वलाटीची साधारण उंची किती असते?

a) 200-250 मी.

b) 250-300 मी.

c) 275-300 मी

d) 300-350 मी.

42. सातमाळा अंजिठा डोंगर रांग कोणत्या दोन रांगाच्या दरम्यान आहे?

a) नर्मदा व गोदावरी

b) गोदावरी व तापी

c) भीमा व गोदावरी

d) मुळामुठा व गोदावरी

43. महाबळेश्वर शंभूमहादेव रांग कोणत्या रांगाच्या दरम्यान आहे?
a) कृष्णा व भीमा
b) भीमा व कावेरी
c) कृष्णा व कावेरी
d) गोदावरी व कृष्णा

44. गोदावरी नदीची लांबी _____ आहे.
a) 1335 कि.मी.
b) 1455 कि.मी.
c) 1555 कि.मी.
d) 1655 कि.मी.

45. कुटुंब न्यायालयाची स्थापना केव्हा झाली?
a) 1984 b) 1985
c) 1986 d) 1987

46. हुंडाबंदी कायदा केव्हा आस्तित्वात आला?
a) 1761 b) 1861
c) 1961 d) 1561

47. पुर्नभरण सहसंबंध म्हणजे काय?
a) दोन घटक स्वतःवर प्रभाव पाडतात
b) एकच घटक स्वतःवर प्रभाव पाडतात
c) कोणताच घटक प्रभाव पाडत नाही
d) प्रत्येक घटक प्रभाव पाडतो

48. कोणाच्या मते लोकसंख्या व संसाधणातील वाढत्या दरीमुळे दारिद्रय व दुःख अपरिहार्य आहे?
a) माल्को b) हिटलर
c) माल्शस d) लुई

49. आंतप्रावरण पृथ्वीच्या किती खोलीवर आहे?
a) 500 ते 800 किमी.
b) 700 ते 1800 किमी.
c) 700 ते 2900 किमी.
d) 2900 ते 3000 किमी.

50. कायिक अपक्षय म्हणजे काय?
a) खडक फुटुन बारीक तुकडे होणे
b) खडक फुटुन माती होणे
c) खडकाला भेगा पडणे
d) खडक झिजणे

51. शिलावरण खालील दोन थर आहेत.
a) सियाल व सायमा
b) सियाल व सीमा
c) लियाल व लिगमा
d) सायमा व सीमा

52. हिमनदीच्या खननामुळे निर्माण झालेले भू-रूपे
a) चबुतरे b) यारदांग
c) भू-छत्र खडक d) हिमानी सरोवर

SECTION - B (गुण : 26)

या विभागात एकूण 26 प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नाला एक गुण याप्रमाणे हा विभाग 26 गुणांचा आहे. या विभागाला उणे गुणपद्धत लागू नाही.

1. वातावरण म्हणजे काय वातावरणाचे थर कोणते?
2. वाऱ्याचे प्रकार कोणते
3. भारताचे वैशिष्ट्य कोणते?
4. भारताशेजारील देशाची नावे लिहा?
5. हिमालयात उगम पावणाऱ्या नद्या कोणत्या
6. उकाई हे धरण कुठे व कोणत्या नदीवर आहे?
7. 'लु' वारे म्हणजे काय?
8. मृदेची व्याख्या लिहा.
9. ऊर्जा निर्मितीच्या साधनांची नावे लिहा?

10. भारतात पहिली कागद गिरणी कोठे व केव्हा सुरू झाली?

11. स्थलांतर म्हणजे काय?

12. महाराष्ट्रातील नगदी पिके कोणती?

13. हरित परिणाम म्हणजे काय?

14. WWF - म्हणजे कोणती संस्था?

15. भारताने जागतिकीकरणाचा स्विकार केव्हा केला?

16. हिंदु विवाह कायदा केव्हा करण्यात आला?

17. हिंदु दत्तक विधान कायदा म्हणजे काय?

18. कायिक अपक्षय म्हणजे काय?

19. सायमा कशाला म्हणतात?

20. गटेनबर्ग विलगता म्हणजे काय?

21. भु-पट्टा म्हणजे काय?

22. महासागर भु-खंड आघात म्हणजे काय?

23. ज्वाला मुखीय भु-खंड म्हणजे काय?

24. डेव्हिडने नदीच्या अपक्षय चक्रांच्या कोणत्या आवस्था सांगितल्या आहेत?

25. हिमनदीच्या कार्याचे प्रकार लिहा?

26. स्थितांबर म्हणजे काय?

SECTION - C (गुण : 28)

हा विभाग दीर्घोत्तरी स्वरूपाचा आहे. या विभागाला 28 गुण आहेत. या विभागाला उणे गुण पद्धत लागू नाही.

1. सुर्यग्रहण म्हणजे काय? त्यांचे प्रकार सांगा?

   किंवा

   पृथ्वीची आकृतीसह रचना स्पष्ट करा.

2. वातावरणातील थरांची माहिती लिहा.

   किंवा

   वाऱ्याचे प्रकार स्पष्ट करा.

3. व्यापारी वाऱ्याचे प्रकार स्पष्ट करा.

   किंवा

   वातावरणातील घटक स्पष्ट करा.

4. वितरण दर्शविणाऱ्या रेषा स्पष्ट करा.

   अथवा

   हिमालयातील उगम पावणाऱ्या नद्या स्पष्ट करा.

